# पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
# पोलीस भरती - २०१७

## कागदपत्र पडताळणीसाठी बोलाविण्यांत आलेल्या उमेदवारांना सुचना

पोलीस भरती -२०१७ मध्ये गुणवत्तेनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात व कागदपत्र पडताळणीचे अधीन राहुन प्रारुप निवडयादी व प्रतिक्षायादी पुणे पोलीस संकेतस्थळावर, महाऑनलाईन संकेतस्थावर तसेच शिवाजीनगर पोलीस मुख्यालयाचे फलकावर प्रसिध्द करण्यांत आली आहे.

सदर प्रारुप निवडयादी व प्रतिक्षायादीनुसार निवड झालेल्या उमेदवारांनी वार-गुरुवार, दिनांक **११/०५/२०१७ रोजी सकाळी ०९.०० वाजता शिवाजीनगर पोलीस मुख्यालय शेड क्र.१** येथे खालील प्रमाणे मुळ कागदपत्र व त्याच्या साक्षांकित केलेल्या छायांकित दोन प्रतीसह बिनचुक समक्ष उपस्थित राहावे. सदर तारखेस व वेळी गैरहजर राहणा-या उमेदवारांचे नांव यादीतुन रद्द करण्यांत येईल. याची नोंद घ्यावी.

१) ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या आवेदन अर्जाच्या दोन प्रती.
२) शाळा सोडल्याचा मुळ दाखला/ एस.एस.सी. मुळ प्रमाणपत्र / बोनाफाईड सर्टिफिकेट.
३) शैक्षणिक पात्रते संबंधीत १२ वी.चे मार्कशिट व प्रमाणपत्र
४) इयत्ता १२ वी.पेक्षा उच्च शिक्षण घेतले असल्यास, पदवीधर/पदवीत्तर शिक्षणाचे प्रमाणपत्र
५) मागास प्रवर्गात मोडत असल्यास जातीचा मुळ दाखला
६) विजा-अ,भज-ब,भज-क,भज-ड,विमाप्र अथवा इमाव प्रवर्गात मोडत असल्यास, दि.१/४/२०१५ ते ३१/४/२०१६ या आर्थिक वर्षाचे वैध असलेले नॉ-क्रिमिलेअर प्रमाणपत्र.
७) माजीसैनिक उमेदवारांनी सैनिक विभागाचे मुळ डिस्चार्ज कार्ड किंवा सक्षम अधिकारी यांचे ना-हरकत प्रमाणपत्र.
८) खेळाडु उमेदवाराने त्यांचे खेळविषयक प्रमाणपत्र व विभागीय उप संचालक यांच्याकडुन खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र.
९) प्रकल्पग्रस्त उमेदवाराने संबंधीत सक्षम प्राधिकारी म्हणजेच पुर्नवसन अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र.
१०) भुकूंपग्रस्त उमेदवाराने संबंधीत सक्षम प्राधिकारी म्हणजेच पुर्नवसन अधिकारी तथा जिल्हाधिकारी / उपविभागीय अधिकारी/तहसिलदार यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र.
११) होमगार्ड उमेदवारांने, होमगार्ड म्हणून जाहिरातीच्या दिनांकास म्हणजे दि.२३/०२/२०१७ रोजी पर्यन्त ३ वर्षे (१०९५ दिवस) एकत्रित सेवा पुर्ण केल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी म्हणजे जिल्हा होमगार्ड समादेश यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र.
१२) पदवीधर/पदवीकाधारक अंशकालीन उमेदवारांनी सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत पदवीधर/पदवीकाधारक अंशकालीन कर्मचा-यांनी शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षे दरमहा मानधनावर काम केल्याबाबत सक्षम प्राधिका-यांनी दिलेले अनुभवाचे प्रमाणपत्र व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या तीन वर्षाच्या अनुभवाची नोंद केल्याचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र.
१३) पोलीस पाल्य उमेदवारांनी, पोलीस पाल्य आरक्षणाचा लाभ देण्याचे अनुषंगाने संबंधीत घटक प्रमुखाने म्हणजे पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक/ समादेशक यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र.
१४) खुल्या प्रवर्गातील महिलांनी, महिला आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी, दि. ०१/०४/२०१५ ते ३१/०३/२०१६ या आर्थीक वर्षाचे वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र.
१५) उमेदवारांनी नजिकच्या काळातील ६ फोटो सोबत आणावेत.

**वरील सर्व प्रमाणपत्रे/कागदपत्रे आवेदन अर्ज भरण्याच्या अंतीम दिनांकापर्यन्त म्हणजेच दिनांक २०/०३/२०१७ किंवा त्यापुर्वीच्या दिनांकाची असणे आवश्यक आहे.**

ठिकाण :- पुणे
दिनांक :- ०६/०५/२०१७.

सही/-
अध्यक्ष, पोलीस भरती समिती -२०१७,
पुणे शहर